नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २८० । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार दि. २४ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## मुंबई-एमएमआरमध्ये पुढील १५ वर्षांत ३० लाख घरे बांधणार

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा; सिद्धेश्वर नगर-रमाबाई नगर क्लस्टरचे भूमिपूजन

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

मुंबई : मुंबईसह महानगर प्रदेशातील घरांची वाढती गरज लक्षात घेऊन पुढील १५ ते २० वर्षांत ३० लाख घरे उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी केली. मुंबईसह ठाणे, मीरा-भाईंदर, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर आदी शहरांमध्ये क्लस्टर पुनर्विकासाला चालना देण्याचे सरकारचे धोरण असून, युनिफाइड डीसीपीआरमधील बदलांमुळे क्लस्टर आणि एसआरए प्रकल्पांना गती मिळाल्याचे त्यांनी सांगितले. ठाणे महापालिकेच्या सिद्धेश्वर नगर-रमाबाई नगर क्लस्टर योजनेच्या भूमि पूजनप्रसंगी ते बोलत होते. एमएमआरमध्ये ३० लाख घरांचे नियोजन यापूर्वीही शिंदे यांनी जाहीर केले असून, त्यात मुंबईत १० लाख आणि एमएमआरच्या अन्य भागांत २० लाख घरांचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

सुमारे २० हेक्टर अर्थात ५० एकर परिसरात विकसित होणाऱ्या सिद्धेश्वर नगर-रमाबाई नगर क्लस्टरमुळे ठाण्यातील सुमारे सहा हजार कुटुंबांना सुरक्षित आणि दर्जेदार घरे मिळणार आहेत. निवासी इम ारती उभारण्याबरोबरच २३ प्रकारच्या नागरी सुविधा, रोजगाराच्या संधी आणि नियोजित टाऊनशिप उभारून 'नवे ठाणे' साकारण्याचे नियोजन असल्याचे शिंदे यांनी सांगितले. ठाणे क्लस्टर योजनेत मोडकळीस आलेल्या इमारती, चाळी आणि झोपडपट्ट्यांचा एकत्रित पुनर्विकास करण्याची संकल्पना आहे.

या प्रकल्पात रुंद रस्ते, मुबलक पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, उद्याने, मैदाने, कम्युनिटी हॉल, जिम्नॅशियम, योग केंद्र, इनडोअर गेम्स, डिजिटल लायब्ररी, डे-केअर सेंटर, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, महिला सक्षमीकरण केंद्र आणि स्मार्ट स्ट्रीट लाइटिंग अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. 'सिटी विथिन द सिटी' या संकल्पनेतून हा विकास केला जाणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

ठाण्यातील धोकादायक इमारतींच्या प्रश्नाचा संदर्भ देताना शिंदे यांनी क्लस्टर योजनेचा प्रवास सुमारे २० वर्षांच्या संघर्षातून पुढे आल्याचे नमूद केले. किसननगरम धील साईराज इमारत दुर्घटनेसह विविध दुर्घटनांनंतर धोकादायक इमारतींच्या प्रश्नावर उपोषणे, मोर्चे आणि विधानसभेत आवाज उठविला. नगरविकास मंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून धोरणात्मक अडथळे दूर करून क्लस्टर योजना प्रत्यक्षात आणल्याचे त्यांनी सांगितले. किसननगरमधील पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्वाकडे असून, लवकरच रहिवाशांना घरांच्या चाव्या देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. ठाणे महापालिकेने क्लस्टर विकासासाठी 'क्लस्टर विकास कंपनी' स्थापन केली असून, ५० नागरी पुनरुत्थान आराखड्यांपैकी १२ आराखड्यांना मंजुरी मिळाली आहे.

'वॉक टू वर्क' संकल्पना

– क्लस्टरमध्ये निवासी बांधकामासोबत व्यावसायिक विकास आणि स्थानिक रोजगारनिर्मितीवरही भर देण्यात येणार आहे. 'वॉक टू वर्क' संकल्पनेतून घराजवळच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची अपेक्षा शिंदे यांनी व्यक्त केली. सिद्धेश्वर तलावाचा पुनर्विकास, स्वच्छता आणि सुशोभीकरण करून तलावाला मोकळा श्वास मिळवून देण्याचेही त्यांनी सांगितले. –



रहिवाशांच्या मागण्यांबाबत कॉर्पस फंड, अतिरिक्त १०० चौरस फुटांची जागा परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणे आणि छोट्या दुकानदारांच्या पुनर्वसनाचा विचार करण्याचे संकेत शिंदे यांनी दिले. विकासकांनी नफा कमी झाला तरी चालेल, मात्र घरांच्या दर्जात तडजोड करू नये, अशी सूचना त्यांनी केली. सरकार आणि महापालिकेकडून आवश्यक सहकार्य देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

## नाशिक विभागात महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत

### दोन टप्प्यांत राबविणार: उपसंचालक महेश इंगळे

**नाशिक (समर्थ गांवकरी)**

नाशिक विभागातील पाच जिल्ह्यातील सात जिल्हा कार्यालयांमध्ये विभागाशी संबंधित अर्धन्यायिक अपील प्रकरणांचा तडजोडीने जलद निपटारा करण्यासाठी महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती भूमी अभिलेख विभागाचे उपसंचालक महेश इंगळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.

भूमी अभिलेख विभागाशी संबंधित प्रलंबित अर्धन्यायिक अपील प्रकरणांचा तडजोडीने जलद निपटारा करण्यासाठी नाशिक विभागात महसूल लोक अदालत होईल. परस्पर संम तीने वाद मिटवू इच्छिणाऱ्या पक्षकारांना या माध्यमातून प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करुन घेता येईल. अहिल्यानगर व जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, शिर्डी कार्यालयातील प्रकरणांसाठी ३० डिसेंबर २०२६ रोजी, नाशिक व जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, मालेगाव कार्यालयातील प्रकरणांसाठी ७ डिसेंबर २०२६ रोजी, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील प्रकरणांसाठी १५ डिसेंबर २०२६ रोजी, तर जळगाव जिल्ह्यातील प्रकरणांसाठी ६ जानेवारी २०२७ रोजी लोक अदालत होईल.

महसूल व वन विभागाने १४ ऑगस्ट रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान राबविण्यात येत आहे.

## समाजरत्न नानजीभाई ठक्कर यांच्या जन्मदिनानिमित्त शैक्षणिक संस्थांमध्ये उत्साहपूर्ण कार्यक्रम!

### राज्यभरातून हजारो राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची शुभेच्छांसाठी अलोट गर्दी

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

हिंदुस्थानातील थोर समाजसेवक दानशूर व्यक्तिमत्व समाजरत्न व संस्थाध्यक्ष श्री. नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांचा जन्मदिन २३ सप्टेंबर रोजी विविध शैक्षणिक संस्थांमध्ये व राज्यातील अनेक जिल्ह्यात व देशातील काही राज्यांमध्ये रक्तदान वह्यावाटप शालेय दप्तर साड्या आरोग्य विभागातील विद्यार्थ्यांना आरोग्य किट अनेक मंदिरांना फरची व शाळेला फरशी अर्पण सोहळा संपन्न झाला यासह विविध कार्यक्रम संपन्न झाले राजकीय नेत्यापेक्षा संघर्ष योद्धा नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांचा वाढदिवस म्हणजे त्यांच्या अनुयायी व कार्यकर्त्यांमध्ये एक प्रकारचा जोश निर्माण होतो उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच नातेवाईकांनी नानजीभाई ठक्कर यांना निरोगी, दीर्घायुषी व सुखमय जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. समाजातील दिनदुबळ्या, गरजू व वंचित घटकांसाठी त्यांनी सुरू ठेवलेले सेवाकार्य यापुढेही





अखंडपणे सुरू राहावे, अशा सदिच्छा यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

या कार्यक्रमास हरिभक्त परायण भागवत कथाकार नाना महाराज देशमुख, हरिभक्त परायण देशमुख ताई...मानद मंत्री नटवरलाल वीरजीभाई ठक्कर, राजेंद्र पुराणी, राजेंद्र पांडे, शेठ टी. जे. एज्युकेशन सोसायटीचे कर्मचारी, सौ. सुवर्णा ठाकरे, डॉ. विश्वासराव आरोटे, गणपत ठाकरे, सुदेश ठाकरे, नीता जोशी, मनोहर दिवाणे आनंदी, दिनेशभाई कोटक, कांती वाघमारे, विनर बिंद्रा, प्रेम तिवारी, महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप पाटील, शेठ टी. जे. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या मनीषाबेन ठक्कर, इंग्रजी शाळा व महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती लिडिया सालियन यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध ठिकाणांहून आलेल्या नागरिकांनीही नानजीभाई ठक्कर यांना शुभेच्छा देत त्यांच्या समाजसेवेचा गौरव केला.

यावेळी चंद्रकांत महाराज डुंबरे यांनी श्री. नानजीभाई ठक्कर यांचा स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. जनसेवेसाठी जीवन समर्पित करणारे नानजीभाई ठक्कर हे चालते-बोलते जालाराम बाप्पा असल्याचे डुंबरे महाराज यांनी नमूद केले. आपल्या सेवाभावी कार्यामागील भावना व्यक्त करताना नानजीभाई ठक्कर म्हणाले, मी काही करत नाही; ईश्वराने मला केवळ निमित्त बनवले आहे.

## दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे वतीने हस्ते शेठ नानजीभाई ठक्कर यांचा अनोख्या पद्धतीने वाढदिवस साजरा

### शाल, पुष्पगुच्छ, बैलगाडा व खारीक-खोबऱ्याच्या हाराने दिल्या शुभेच्छा!







**ठाणे (समर्थ गांवकरी)**

**थोर समाजसेवक तथा दानशूर व्यक्तिमत्व शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांचा वाढदिवस विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी शेठ नानजीभाई ठक्कर यांना शाल, पुष्पगुच्छ, बैलगाडा तसेच खारीक-खोबऱ्याचा हार घालून अनोख्या पद्धतीने वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.**

याप्रसंगी ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे, माळशेज नागरी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश प्रसिद्धी प्रमुख तथा दैनिक समर्थ गांवकरीचे कार्यकारी संपादक नवनाथजी जाधव, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष तथा संपादक दशरथ चव्हाण, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका अध्यक्ष अशोक उगले दैनिक समर्थ गांवकरीचे व्यवस्थापक संजय फुलसुंदर, मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे, नगरसेवक ज्ञानेश्वर रायकर, टायगर ग्रुपचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष उमेश पोखरकर, नवी मुंबईचे पत्रकार राजू वीर, आळंदी नगरपालिकेचे माजी नगरसेवक मनोहर दिवाने, पुण्याचे नामवंत उद्योजक कृष्णा बिरादार, माळशेज नागरी पतसंस्थेच्या कार्यकारी संचालिका नयनाताई डुंबरे, एन.के.टी. ट्रस्टचे सचिव नटू काका ठक्कर तसेच रमेश ठक्कर आदी मान्यवर उपस्थित होते.

शेठ नानजीभाई ठक्कर यांनी सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक तसेच विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये दिलेल्या योगदानाबद्दल यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देत विविध उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्व म्हणून शेठ नानजीभाई ठक्कर यांचा यावेळी गौरव करण्यात आला. त्यांच्या वाढदिवसानिमि त्त उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा देत निरोगी आयुष्य, दीर्घायुष्य आणि त्यांच्या



समाजसेवेच्या कार्याला सातत्याने बळ मिळावे, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

## संक्षिप्त

### जय मीनाचे सॉफ्ट टेनिसमधील ऐतिहासिक यश

**पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून कौतुकाचा वर्षाव**

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

जपानमधील आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताचा युवा खेळाडू जय मीना याने इतिहास घडवला आहे. पुरुषांच्या एकेरी सॉफ्ट टेनिस स्पर्धेत त्याने चमकदार कामगिरी करत कांस्यपदक आपल्या नावावर केले. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात भारताने सॉफ्ट टेनिस या खेळात जिंकलेले हे आतापर्यंतचे पहिलेच पदक आहे. या अभूतपूर्व आणि ऐतिहासिक विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जय मीनाचे मनापासून अभिनंदन केले आहे.

### २७ सप्टेंबरला रविवार असूनही बँका सुरू राहणार

मुंबई : बँक कर्मचारी संघटनांनी २८ ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान पुकारलेल्या देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. सलग अनेक दिवस बँकिंग सेवा ठप्प होऊ नयेत, यासाठी रविवार, २७ सप्टेंबर रोजी सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वित्त मंत्रालयाच्या निर्देशानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेनेही बँकांना रविवारी कामकाज सुरू ठेवण्याची परवानगी दिली आहे.

### कुंभमेळ्याच्या कामांमुळे यंदा पंचवटी कारंजा येथे मुख्य मिरवणुकीचा समारोप

**नाशिक (समर्थ गांवकरी)**

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात सुरू असलेल्या विविध विकासकामांचा परिणाम यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीवर होणार आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी नाशिकची मुख्य गणेश विसर्जन मिरवणूक पंचवटी कारंजा येथे समाप्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदा मिरवणूक रामकुंडापर्यंत जाणार नसून मोठ्या गणेशमूर्तींचे विसर्जन म्हसोबा पटांगण परिसरात करण्यात येणार आहे. नाशिक गणेशोत्सव महामंडळाच्या माहितीनुसार, मुख्य मिरवणूक नेहमीच्या मार्गाने वाकडीबारव-मेनरोड-एम.जी. रोड-अशोक स्तंभ-रविवार कारंजा-पंचवटी कारंजा अशी येईल. पंचवटी कारंजा येथे मुख्य मिरवणुकीचा समारोप केला जाणार आहे.

### समुद्रात जहाजांना पाळावे लागतात वाहतुकीचे नियम!

रस्त्यावर वाहन चालवताना वाहतुकीच्या नियमांचं काटेकोरपणे पालन करावं लागतं. सिग्नल, हेल्मेट यासह अनेक वाहतुकीचे नियम आहेत. गाडी चालवताना या नियमांचं पालन करणं बंधनकारक आहे. नाही तर वाहतूक पोलीस तुम्ही केलेल्या चुकीसाठी दंड ठोठावतात. वाहतुकीचे नियम पाळले नाही तर अपघाताचं प्रमाण वाढत जाईल. त्यासाठी या नियमांचं काटेकोरपणे पालन करण्याचं आवाहन केलं जातं.

### मिराबाई चानूची सुवर्ण भरारी

**आशियाई क्रीडा स्पर्धेत ४९ किलो वजनी गटात रौप्य पदकाची कमाई**

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

भारताची स्टार वेटलिफ्टर मिराबाई चानूने आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये इतिहास रचला आहे. महिलांच्या ४९ किलो वजनी गटात तिने चमकदार कामगिरी करत रौप्य पदक आपल्या नावावर केले. या शानदार विजयामुळे तिच्या आजवरच्या थक्क करणाऱ्या कारकिर्दीत अखेर आशियाई क्रीडा स्पर्धेच्या पदकाची मोलाची भर पडली आहे. या स्पर्धेत उतरण्यापूर्वी मिराबाईच्या नजरेसमोर एक मोठे ध्येय होते, कारण याआधी आशियाई क्रीडा स्पर्धेत तिला पदक मिळवता आले नव्हते.

# प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे संतप्त शेतकरी प्रांताधिकारी कार्यालयात घुसले

■ फ्लेक्स लावायचे काम प्रांताधिकार्यांचे नसते, त्यांचे गुलाम होता का ?

■ माजी मंत्री बाळासाहेब थोरात प्रशासनावर नाराज

संगमनेर (समर्थ गांवकरी)

तालुक्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती, विजेचा झालेल्या खेळ खंडोबा आणि डोळ्यादेखत तालुक्यातून वाहून चाललेले हक्काचे पाणी मिळावे याकरता आज हजारो शेतकरी नागरिक व महिला यांनी रस्त्यावर येत भव्य जन आक्रोश मोर्चा केला. या जन आक्रोश मोर्चाचे निवेदन स्वीकारण्यासाठी प्रांताधिकारी हे राजकीय दबावातून उपस्थित न राहिल्याने उपस्थित शेतकऱ्यांमध्ये मोठा संताप निर्माण झाला. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या नाकर्तेपणाच्या भूमिके विरोधात तीव्र घोषणाबाजी करत नाराजी व्यक्त करून प्रांताधिकारी कार्यालयामध्ये प्रवेश केला. आक्रमक झालेल्या शेतकऱ्यांना शांत करून काँग्रेस पक्षाचे नेते व राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात व मान्यवरांनी प्रांत कार्यालयाच्या पायऱ्यांवरती ठिय्या ही आंदोलन केले..

जन आक्रोश मोर्चा हजारोंच्या संख्येने प्रांत कार्यालयावर दाखल झाला .खरे तर या मोर्चामध्ये मा. महसूल मंत्री काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात , माजी आमदार डॉ सुधीर तांबे ,माजी नगराध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे, युवा काँग्रेसचे अध्यक्ष डॉ जयश्रीताई थोरात, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, अमोल शेरकर यांच्यासह संगमनेर तालुक्यातील शिखर संस्थांचे पदाधिकारी हे उपस्थित होते. अशावेळी प्रशासनाच्या वतीने निवेदन स्वीकारण्यासाठी प्रांताधिकारी अरुण मुंडे यांनी उपस्थित राहणे अत्यंत गरजेचे होते.

कारण या मोर्चा बाबत चार दिवसापूर्वी त्यांना सविस्तर निवेदन देऊन मोर्चाची माहिती देण्यात आली होती. तरीही प्रशासन उदामपणे वागले. शेतकरी संकटात असताना अधिकारी मस्तीत वागले. याचा संताप निर्माण झाला. ऑक्टोबर हिट मध्ये सूर्य तळपत असताना हजारो शेतकरी व महिला रस्त्यावर बसून होत्या अशा परिस्थितीमध्ये अधिकारी मात्र निर्धावलेल्या परिस्थितीत होते.

संगमनेर तालुक्यातील प्रशासन व अधिकारी हे राजकीय दबावाखाली काम करत असून संगमनेर तालुक्यातील नागरिकांशी अत्यंत हिनेतेने वागत आहे. याची वारंवार प्रचिती नागरिकांना आली आहे. आणि आज तर या अधिकाऱ्यांनी कहर केला यामुळे सर्व नागरिक संतप्त झाले.

हजारो शेतकरी पुन्हा तळपत आहेत अशावेळी प्रांताधिकारी कार्यालय निवेदन स्वीकारायला यावे अशी मागणी डॉ जयश्रीताई थोरात यांनी केली. प्रांताधिकारी अरुण उंडे हे निवेदन स्वीकारण्यासाठी येत नाहीत हे पाहून डॉक्टर जयश्रीताई थोरात चांगल्याच संतापल्या.

यानंतर प्रशासनाच्या वतीने प्रांत अधिकारी उंडे हे येत नाही यावरून शेतकरी खूप आक्रमक झाले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ कुणाल सोनवणे तहसीलदार धीरज मांजरे पोलीस निरीक्षक समीर बारवकर वीज वितरणाचे कार्यकारी अभियंता नारायण सोनवणे




यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. निवेदन स्वीकारायला या या मागणीनंतर शेतकरी आक्रमक होताच त्यांनी प्रांताधिकारी कार्यालयाचे गेट ओलांडून आत मध्ये प्रवेश केला.

शेतकऱ्यांचा संताप पाहून काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी सर्व शेतकरी व युवकांना शांत केले व यानंतर प्रांताधिकारी कार्यालयाच्या पायऱ्यांवरती सर्व पदाधिकाऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले.

शेतकरी मागे हटायला तयार नाही हे पाहून प्रशासनाने आपली भूमिका बदलली व त्यानंतर प्रांताधिकारी अरुण उंडे हे निवेदन स्वीकारण्यासाठी यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती प्रशासकीय भावनांमध्ये आले. यानंतर मोर्चाच्या ठिकाणी येऊन त्यांनी निवेदन स्वीकारले. संतप्त शेतकऱ्यांनी अनेक सवाल केले.

### आमदाराचे फ्लेक्स लावायचे काम प्रांताधिकार्यांचे नसते,तुम्ही त्यांचे गुलाम झाला का

प्रांताधिकारी हा या तालुक्याच्या सर्व विभागांचा प्रमुख असतो. हजारो शेतकरी मोठ्या संख्येने निवेदन घेऊन येतात त्यांच्या मागण्या मांडतायेत आणि प्रशासन आणि प्रांताधिकारी हे कुणाच्यातरी राजकीय दबावाखाली काम करत आहेत. सध्याचे आमदारांनी शिव्या दिल्या तर तुम्ही ऐकून घेता. त्यांचे फ्लेक्स लावायचे काम करतात. हे काम प्रांताधिकार्यांचे नसते तुम्ही त्यांचे गुलाम झाला का असे खडे बोल माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी प्रशासनाला सुनावले. तर प्रांताधिकारी उंडे म्हणाले की नियोजित कार्यक्रम होता परंतु माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे मोर्चामध्ये आहे हे हे कळालं तर मी तातडीने आलो. तरीही शेतकऱ्यांच्या तीव्र भावना प्रशासना विरोधात होत्या. यावेळी नागरिकांनी प्रशासन व सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

# कृषिमंत्र्यांच्या आढावा बैठकीच्या पार्श्वभूमीवर प्रभारी विभागीय आयुक्तांनी घेतली पूर्वतयारी बैठक

नाशिक (समर्थ गांवकरी)

विभागातील टंचाईसदृश परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे हे दि. २६ सप्टेंबर रोजी नाशिक दौऱ्यावर येत असून, त्यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे आढावा बैठक होणार आहे. या बैठकीच्या अनुषंगाने विभागस्तरावर आवश्यक पूर्वतयारी करण्यासाठी प्रभारी विभागीय आयुक्त आयुषप्रसाद यांनी आज दूरदृश्यप्रणालीद्वारे पूर्वतयारी बैठक घेतली.

या बैठकीस विभागातील जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, सहसंचालक (कृषी), जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रशासकीय प्रमुख उपस्थित होते.

या आढावा बैठकीच्या पार्श्वभूमीवर विभागातील जिल्हानिहाय परिस्थिती, टंचाईसदृश परिस्थितीशी संबंधित उपलब्ध माहिती तसेच संबंधित विभागांकडून करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची अद्ययावत माहिती बैठकीसाठी तयार ठेवण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. प्रत्येक जिल्ह्याने आपल्या कार्यक्षेत्रातील परिस्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन आवश्यक माहिती व अहवाल अद्यावत ठेवावा, अशा सूचना श्री. आयुष प्रसाद यांनी दिल्या.

विभागनिहाय माहितीचे संकलन, आवश्यक आकडेवारी व सद्यस्थितीची माहिती व्यवस्थितपणे द्यावी. कृषी विभागासह संबंधित सर्व विभागांनी समन्वयाने काम करून कृषिमंत्र्यांच्या आढावा बैठकीसाठी आवश्यक पूर्वतयारी पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

दि. २६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या आढावा बैठकीत विभागातील टंचाईसदृश परिस्थितीचा जिल्हानिहाय आढावा घेऊन संबंधित विभागांकडून सादर करण्यात येणाऱ्या माहितीच्या आधारे पुढील कार्यवाहीबाबत चर्चा होणार आहे. त्यामुळे सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक माहिती अद्ययावत ठेवून बैठकीसाठी सज्ज राहावे, यावर पूर्वतयारी बैठकीत सूचना देण्यात आल्या.

# खैराती वाटप की मनमानी कारभार? श्री नागेश विद्यालयाच्या प्राचार्यांची तडकाफडकी बदली!

## ५० शिक्षक असलेल्या शाळेत ६४ जणांची स्थानिक सल्लागार पदी निवड; निकषांना हरताळ फासला

जामखेड (समर्थ गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या श्री नागेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या स्थानिक सल्लागार तथा समन्वय समितीवर सन २०२६-२७ ते २०२८-२९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी नागेश विद्यालयाचे प्राचार्य बी के मडके यांनी ६४ च्या आसपास सदस्यांची निवड करून खिरापती प्रमाणे पदाचे वाटप केले. सदर पदे वाटप करताना कोणताही निकष पाळला नाही. तसेच विद्यालयासाठी योगदान काय याचे भान ठेवले नाही त्यामुळे या नियुक्त्यांनंतर सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटताना दिसत असून, सल्लागार पदांची संख्या, निवडीची पद्धत आणि या पदांमागील नेमकी जबाबदारी यावरून टिकात्मक चर्चा सुरू झाली आहे. रयत संस्थेने सदर घटनेची नोंद घेऊन प्राचार्य बी के मडके यांची तडकाफडकी बदली केली आहे.

रयत शिक्षण संस्थेचे श्री नागेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य बी के मडके यांनी आठ दिवसांत ६४ च्या आसपास सल्लागार सदस्यांची निवड त्यांच्या पत्राद्वारे केली आहे. विद्यालयाच्या शैक्षणिक व भौतिक विकासासोबतच विद्यार्थीहिताच्या उपक्रमांना चालना देण्यासाठी स्थानिक सल्लागार तथा समन्वय समिती काम करेल असा याचा उद्देश प्राचार्यांनी निवड झालेल्या पत्रात केला आहे. सल्लागार अगर समन्वयाचे पद मिळाले यामुळे अनेक कार्यकर्ते खुश झाले. अनेकांनी सोशल मिडीयावर व स्टेटसला निवडीचे पत्र ठेवून अभिनंदन स्विकारली आहे. तसेच बातमी देण्यासाठी वार्ताहर कडे धाव घेतली आहे व अनेकांनी सत्कार करून घेतले. तसेच बातमी करून पाठवताना काही जणांनी आ. रोहीत पवार, राजेंद्र कोठारी, राष्ट्रवादीचे पदाधिकारी व नगरसेवक असा उल्लेख केला आहे.चार ते पाच कार्यकर्त्यांना हे पद दिले असेल असा समज अनेकांचा होता. सोशल मिडीयावर मात्र जो तो प्राचार्यांनी दिलेले पत्र प्रसिद्ध करत आहेत. दरम्यान, सोशल मीडियावरील काही प्रतिक्रियांमध्ये 'सल्लागार पदाची बंपर भरती', 'पद मिळाले; आता काम कधी?' तसेच विद्यालयाचा संपूर्ण स्टाप ५० जणांचा निवड मात्र ६० जणांची अशा स्वरूपाची खोचक टीका करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. काहींनी या नियुक्त्यांकडे राजकीय व सामाजिक प्रतिनिधित्वाच्या दृष्टिकोनातून पाहिले आहे, तर काहींनी नियुक्त्यांपेक्षा विद्यालयाच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.




### श्री नागेश माध्यमिक व उच्च माध्यमिक : प्राचार्य बी के मडके

सदर सल्लागार /समन्वय पदे शाळेचे उपक्रम व इतर मदत होईल यादृष्टीने केली होती. परंतु काही जणांच्या हेवेदावे यातून पदे माझ्या पत्राने दिली आहे. मोठय़ा प्रमाणावर पदे वाटले गेले आहे हे खरे असले तरी याबाबत संस्थेचे मार्गदर्शन घेऊन सदर पदे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येईल. याबाबत आ. रोहीत पवार यांची भेट घेऊन त्यांना याबाबत माहिती अवगत करणार आहे.माझे सेवानिवृत्तीचे सहा महिने झाले आहे त्यातच अचानक बदली झाली.

# स्वच्छ सेवा आकलन उपक्रमांतर्गत ठाणे जिल्ह्यात स्वच्छता व्यवस्थेचे स्वयंमूल्यांकन

## जिल्ह्यातील ७०६ गावे ODF Plus; 627 गावे ODF Plus (Model) श्रेणीत

ठाणे (समर्थ गांवकरी)

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत ग्रामीण भागातील स्वच्छता व्यवस्थेची गुणवत्ता, सातत्य आणि परिणामकारकता अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने 'स्वच्छ सेवा आकलन' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छता सेवांचे स्वयंमूल्यांकन, प्रत्यक्ष पडताळणी, त्रुटींची पूर्तता आणि आवश्यक सुधारणा करण्यावर भर देण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यात सध्या ७०६ गावे ODF Plus असून त्यापैकी ६२७ गावे ODF Plus (Model) म्हणून विकसित झाली आहेत.

स्वच्छ सेवा आकलन हे ग्रामपंचायत स्तरावर करण्यात येणाऱ्या वार्षिक डिजिटल स्वयंमूल्यांकनाची प्रक्रिया असून, ग्रामीण स्वच्छता सेवा पुरवठ्याची कार्यक्षमता, पारदर्शकता आणि सातत्यपूर्ण सुधारणा यांना चालना देणे हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे. ODF Plus (Model) गावांमध्ये हागणदारीमुक्त स्थितीची शाश्वतता, घन व द्रव कचरा व्यवस्थापनाच्या साधनांची कार्यक्षमता तसेच त्यांचे योग्य कार्यान्वयन व देखभाल सुनिश्चित करण्यासाठी या आकलनाचा उपयोग करण्यात येणार असल्याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छ भारत मिशन) पंडित राठोड यांनी दिली.

स्वच्छता व्यवस्थेच्या पाच प्रमुख घटकांवर भर

स्वच्छ सेवा आकलनामध्ये ODF स्थितीची शाश्वतता, घन व द्रव कचरा व्यवस्थापन, दृश्य स्वच्छता, घन-द्रव कचरा व्यवस्थापन (SLWM²) साधनांचे कार्यान्वयन व देखभाल आणि सामुदायिक स्वच्छता संकुलांचे (CSC) कार्यान्वयन व देखभाल या प्रमुख बाबींचा समावेश आहे.

ग्रामपंचायत सचिवांनी शत्रीराडुरीरक्ष पोर्टलवरून ODF Plus (Model) ग्राम पंचायतीची माहिती भरावयाची असून, त्यानंतर ग्रामसभेसमोर माहिती सादर करून चर्चा व आवश्यक दुरुस्ती करण्यात येणार आहे. ग्रामसभेच्या मान्यतेनंतर अंतिम माहिती पोर्टलवर सादर केली जाणार आहे. त्यानंतर जिल्हास्तरावर प्राप्त माहितीचे परीक्षण करून त्रुटी व कमतरता आढळल्यास त्यांची पूर्तता करण्यासाठी नियोजनबद्ध कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे.

या प्रक्रियेमध्ये ग्रामपंचायत, ग्राम पाणी व स्वच्छता समिती (VWSC), स्थानिक समुदाय, ग्रामसेवक, संबंधित अधिकारी-कर्मचारी यांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून आकलनाची पडताळणी करून समुदायाचा सहभाग, प्रशासनातील उत्तरदायित्व आणि स्वच्छता सेवांबाबतची जबाबदारी अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात येत आहे.



त्रुटींची पूर्तता करून स्वच्छतेचा दर्जा उंचावण्यावर भर- स्वच्छ सेवा आकलनातून प्राप्त होणाऱ्या निष्कर्षांच्या आधारे ग्रामपंचायत स्तरावरील त्रुटी व कमतरता ओळखून त्यावर कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावर आवश्यकतेनुसार जिल्हा सुधारणा आराखडा (DIP) तयार करून स्वच्छता व्यवस्थेत सातत्यपूर्ण सुधारणा करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्ह्यातील ODF Plus आणि ODF Plus (Model) गावांमध्ये स्वच्छता सुविधांची कार्यक्षमता, देखभाल आणि नागरिकांचा सहभाग यांना प्राधान्य देण्यात येत आहे. प्रत्येक गावाने केवळ ODF Plus दर्जा प्राप्त करण्यापुरते मर्यादित न राहता, स्वच्छता सुविधा नियमितपणे कार्यरत ठेवून त्यांची प्रभावी देखभाल करावी आणि नागरिकांच्या सहभागातून स्वच्छतेची चळवळ अधिक बळकट करावी, यासाठी जिल्हा परिषदेमार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.

# सदगुरु कृषी महाविद्यालयात रंगणार आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचा थरार

## २९ व ३० सप्टेंबर रोजी कुस्ती, शरीरसौष्ठव व वजन उचलणे स्पर्धांचे आयोजन

मिरजगाव (समर्थ गांवकरी)

सदगुरु कृषी महाविद्यालय, मिरजगाव येथे विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्यातील शारीरिक सामर्थ्य, आत्मविश्वास, शिस्त व खिलाडूवृत्तीला चालना देण्याच्या उद्देशाने दि. २९ व ३० सप्टेंबर २०२६ रोजी आंतर महाविद्यालयीन कुस्ती, शरीरसौष्ठव व वजन उचलणे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धांमध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत संलग्नित विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, कुस्तीच्या आखाड्यातील चुरशीच्या लढती, शरीरसौष्ठवातील दमदार प्रदर्शन आणि वजन उचलण्याच्या स्पर्धेतील सामर्थ्याचा रोमांचक अनुभव क्रीडाप्रेमींना घेता येणार आहे.

कुस्ती, शरीरसौष्ठव आणि वजन उचलणे या तीनही क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच आत्मविश्वास, संयम, मेहनत, चिकाटी आणि सकारात्मक स्पर्धात्मक वृत्ती निर्माण होण्यास मदत होणार आहे.



स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या वतीने आवश्यक क्रीडा सुविधा, खेळाडूंची नोंदणी, वजन तपासणी, पंच व तांत्रिक समिती, प्रथमोपचार तसेच इतर आवश्यक व्यवस्थांचे नियोजन करण्यात आले आहे.

श्री. संत गजानन महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. शंकरशेठ नेवसे, अध्यक्षा सौ. कल्याणीताई नेवसे, सचिव राजेंद्रजी गोरे आणि सद्गुरु कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामदास बिटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, क्रीडा विभाग व कर्मचारी यांच्या सहकार्याने या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.

# चार हजार विद्यार्थ्यांच्या सहभागाने श्रीगोंद्यात कर्मवीर जयंतीची भव्य मिरवणूक; विविध पथकांच्या सादरीकरणाने शहर भारावले

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक संकुलाच्या संयुक्त विद्यमाने काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत तब्बल चार हजार विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. लेझीम, झांज पथक, दिंडी नृत्य, रामायण देखावा आणि एनसीसीच्या शिस्तबद्ध पथसंचलनाने श्रीगोंदावासी मंत्रमुग्ध झाले.

महादजी शिंदे विद्यालय, महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय आणि महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने हा जयंती सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, जनरल बॉडी सदस्य गणेश भोस, स्थानिक स्कूल कमिटीचे पदाधिकारी, महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वर्षा भोईटे आणि महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या शमिम शेख यांच्या हस्ते कर्मवीरांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.

मिरवणुकीत श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाच्या झांज पथकाने पारंपरिक वाद्यांच्या गजरात वातावरण भारावून टाकले. महादजी शिंदे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लेझीम पथक, झांज पथक आणि दिंडी नृत्याचे आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी साकारलेला रामायण देखावा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला, तर महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या एनसीसी पथकाने शिस्तबद्ध पथसंचलन करून मिरवणुकीची शोभा वाढवली.

या मिरवणुकीत रयत शिक्षण संस्थेचे विद्यमान आणि माजी रयत सेवक, माजी विद्यार्थी, विविध संस्थांचे पदाधिकारी, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच पत्रकार मोठ्या संख्येने सहभागी झाले.

मिरवणुकीच्या मार्गावर शहरातील विविध तरुण मंडळे आणि सामाजिक संस्थांनी विद्यार्थ्यांसाठी पाणी, चहा, नाश्ता, बिस्किटे आणि केळीचे वाटप करून सेवाभावाची परंपरा जपली. नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे मिरवणुकीचा उत्साह आणखी द्विगुणित झाला.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी सजलेले सांस्कृतिक देखावे, पारंपरिक वेशभूषा, लेझीम-झांज पथकांचे दमदार सादरीकरण, दिंडी नृत्य, रामायण देखावा आणि एनसीसीच्या शिस्तबद्ध संचलनामुळे संपूर्ण श्रीगोंदा शहर कर्मवीरांच्या विचारांनी दुमदुमून गेले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा जागर करणारी ही मिरवणूक दिवसभर शहरात चर्चेचा विषय ठरली आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग तसेच नागरिकांच्या सहकार्यामुळे जयंती सोहळा संस्मरणीय ठरला.



# थोडक्यात पण महत्त्वाचे

## या अल्लाह, रहमतचा पाऊस बरसू दे; हजारो हात दुवेसाठी उंचावले



पारनेर (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला असून, पावसासाठी मुस्लिम बांधवांनी पारनेर येथील ईदगाह मैदानावर विशेष नमाज अदा करून सामूहिक दुवा मागितली. यावेळी चिमुकल्यांपासून ज्येष्ठांपर्यंत हजारो नागरिकांनी हात उंचावून तालुक्यात भरपूर पाऊस पडावा, शेतकऱ्यांच्या पिकांना जीवदान मिळावे, पाणीटंचाईचे संकट दूर व्हावे तसेच देशात शांतता आणि सलोखा नांदावा, अशी मनोभावे प्रार्थना केली. पारनेर तालुक्यात यंदा पावसाने ओढ दिल्याने शेतीच्या कामांवर मोठा परिणाम झाला आहे. पावसाअभावी शेतातील उभी पिके करपण्याची परिस्थिती निर्माण झाली असून, नदी, नाले, ओढे तसेच विहिरींच्या पाणीपातळीत घट झाली आहे. त्यामुळे शेतीसाठी पाण्याबरोबरच पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चारा–पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर पावसासाठी विशेष नमाजचे आयोजन करण्यात आले.मुस्लिम धर्मगुरू डॉ. आर. जी. सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली ईदगाह मैदानावर विशेष नमाज अदा करण्यात आली. यावेळी परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नमाजानंतर झालेल्या दुवामध्ये सर्व समाजातील शेतकरी, पशुपालक आणि नागरिकांवर आलेले पाणीटंचाईचे संकट दूर व्हावे, पावसाचे आगमन व्हावे, जलस्रोत पुन्हा भरून निघावेत आणि परिसरात सुख–समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना करण्यात आली.

## लोणेश्वर विद्यालयाच्या मुलींच्या व्हॉलीबॉल संघाचे तालुकास्तरावर उपविजेतेपद



पारनेर (समर्थ गांवकरी)

तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये श्री भगवंत नाथुजी कोल्हे लोणेश्वर विद्यालय, लोणी हवेली येथील मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने उल्लेखनीय कामगिरी करत तालुकास्तरावर उपविजेतेपद पटकावले. मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय, पानोली येथे तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

लोणी हवेली या छोट्याशा ग्रामीण भागातील विद्यार्थिनींनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीपर्यंत दमदार लढत दिली. संघातील कर्णधार प्राची कोल्हे, समृद्धी कोल्हे, सानेश्वरी दुधाडे, मानशी सोंडकर, नव्या कोल्हे, सुप्रिया कोल्हे, कार्तिकी कोल्हे व तनुजा गुंजाळ यांनी आपल्या खेळाने उपस्थितांची मने जिंकली.विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पारनेर तालुका शालेय क्रीडा अध्यक्ष बापूराव होळकर सर, पानोलीचे मुख्याध्यापक काळे सर, ऋषीकेश नगरे सर, जाधव सर, खोडदे सर, शिंदे सर, कार्ले सर तसेच लोणेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक रेपाळे सर, दातीर सर, सोनाली मॅडम, पल्लवी मॅडम, जासूद सर व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संघाचे अभिनंदन केले.

## अध्यात्मिक क्षेत्रातील योगदानाबद्दल स्वामी समर्थ तपोवन केंद्रात सुनील त्र्यंबके यांचा सन्मान



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

सामाजिक कार्याबरोबरच आध्यात्मिक क्षेत्रात श्रद्धा सबुरीने काम करीत साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून सावेडी उपनगरात साई मंदिर उभारले,प्रती शिर्डीप्रमाणे भक्तांसाठी दर्शन, महाप्रसाद याची सोय केली. राजकारण कमी आणि समाजकारण जास्त अशी भूमिका सातत्याने ठेवून साईबाबांच्या कृपेने आध्यात्मिक क्षेत्रातील सुनील त्र्यंबके यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या अभिष्टचिंतन निमित्त स्वामींचा प्रसाद म्हणून प्रतिमा भेट देऊन त्यांचा केंद्राचे वतीने सन्मान करीत आहोत. असे प्रतिपादन त्रंबकेश्वर स्वामी समर्थ केंद्राचे अहिल्यानगर जिल्ह्यातील नगर व जामखेड तालुक्याचे अध्यक्ष एकनाथ खिलारी यांनी केले. सावेडी उपनगरातील प्रभाग क्रमांक दोनचे माजी नगरसेवक साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुनील त्र्यंबके यांच्या वाढदिवसा निमित्त तपोवन रोडवरील श्री. स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बबन पालवे, भाऊसाहेब देशमाने, सुभाष निंबाळकर, संतोष शिंदे, महादेव शिरसाठ, कानिफनाथ साबळे, देविदास डहाळे, अभिजीत खामकर, पाटील साहेब हभप रविंद्र महाराज आव्हाड, आगडगाव भैरवनाथ देवस्थानचे अध्यक्ष नितीन कराळे आदींसह सर्व सेवेकरी उपस्थित होते. श्री.खिलारी यांनी सुनील त्र्यंबके यांच्या सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक कार्याची माहिती यावेळी दिली.यावेळी सन्मान स्वीकारल्या नंतर श्री. त्र्यंबके यांनी तपोवन केंद्रासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे सांगितले. हा सन्मान माझा नसून सर्व भक्तांचा आहे.असे ते म्हणाले.

# प्रशासकीय गतिमानता अभियानात नावीन्यपूर्ण उपक्रमांसह प्रभावी दस्तऐवजीकरण महत्वाचे

## प्रभारी विभागीय आयुक्त आयुषप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्यप्रणालीद्वारे आढावा बैठक

नाशिक (समर्थ गांवकरी)

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानांतर्गत शासनाला अपेक्षित असलेल्या बाबींवर काम करताना प्रत्येक विभागाने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत. तसेच राबविलेल्या उपक्रमांचे प्रभावी दस्तऐवजीकरण करून त्याचे योग्य पद्धतीने सादरीकरण करावे, असे आवाहन प्रभारी विभागीय आयुक्त आयुषप्रसाद यांनी केले.

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानाच्या अनुषंगाने आज विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक घेण्यात आली. बैठकीस विभागातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी तसेच विविध विभागांचे प्रशासकीय प्रमुख उपस्थित होते.

प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान आणि परिणामकारक करण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे. राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानाचा प्रत्यक्ष कृती कालावधी २० ऑगस्ट ते २ ऑक्टोबर असा असून, अभियानाच्या माध्यमातून प्रशासनात नावीन्यपूर्ण कार्यपद्धती, गुणवत्तापूर्ण सेवा आणि नागरिककेंद्री प्रशासनाला अधिक गती देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

बदलत्या तंत्रज्ञानाचा स्वीकार, प्रशासनातील कार्यपद्धतीत सुधारणा, सेवांची गुणवत्ता वाढविणे आणि नागरिकाभिमुखता यावर अभियानात विशेष भर देण्यात आला आहे. कार्यालयीन व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण, ई–गव्हर्नन्स, संसाधनांचा प्रभावी वापर, तंटा व तक्रारमुक्त कार्यालय तसेच नावीन्यपूर्ण व पथदर्शी संकल्पना, प्रयोग आणि उपक्रम ही अभियानातील प्रमुख कार्यक्षेत्रे आहेत. केवळ उपक्रम राबविणे पुरेसे नसून त्यातून झालेला परिणाम स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे, या भूमिकेतून सर्व विभागांनी कामाचे नियोजन करण्याची गरज असल्याचे आयुषप्रसाद यांनी बैठकीत अधोरेखित केले. चांगल्या कामांची नोंद, त्यामागील संकल्पना, अंमलबजावणीची पद्धत आणि नागरिकांना झालेला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष लाभ यांचे व्यवस्थित दस्तऐवजीकरण केल्यास त्या उपक्रमांची इतर कार्यालयांमध्येही प्रभावीपणे अंमलबजावणी करता येऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

अभियानांतर्गत कार्यालयीन व्यवस्थापनातील आधुनिक संकल्पना, सेवांच्या गुणवत्तेत झालेली वाढ, लोकाभिमुख प्रशासन, ई–गव्हर्नन्स, पर्यावरणपूरक व्यवस्था, तक्रारींच्या प्रभावी निवारणासाठी केलेले उपाय आणि नावीन्यपूर्ण उपक्रम या बाबींचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. नावीन्यपूर्ण उपक्रमांचा नागरिकांना झालेला प्रत्यक्ष लाभ तसेच त्याची सातत्यपूर्ण अंमलबजावणी यांनाही महत्त्व देण्यात आले आहे. अभियानाच्या स्पर्धेसाठी तालुका, जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरावर निवड समिती त्यांची रचना करण्यात आली असून विविध स्तरांवर उत्कृष्ट कामांची निवड केली जाणार आहे. मूल्यांकनासाठी अनुकरणीयता, सहज अंमलबजावणी, परिणामांचे परिमाणात्मक मूल्यमापन, विविध स्तरांवर अंमलबजावणीची शक्यता, नागरिकांना होणारा लाभ आणि उपक्रमाची परिणामकारकता यांसारखे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

याशिवाय, उत्कृष्ट उपक्रमांची इतर विभागांमध्येही अंमलबजावणी व्हावी यासाठी त्यांच्या दस्तऐवजीकरणावर विशेष भर देण्यात आला आहे. त्यामुळे विभागातील सर्व कार्यालयांनी आपापल्या उल्लेखनीय कामांची माहिती व्यवस्थित संकलित करून, त्याचे पुराव्यानिशी सादरीकरण करण्याची तयारी ठेवावी, असे आवाहन बैठकीत करण्यात आले.

# ‘लोकसंवाद–२०२६’ उपक्रमांतर्गत ज्येष्ठ नागरिक, महिलांसाठीच्या योजनांची नागरिकांना माहिती

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, लोककल्याणकारी निर्णय आणि जनहिताच्या उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभर राबविण्यात येत असलेल्या ‘लोकसंवाद–२०२६’ या विशेष जनजागृती उपक्रमांतर्गत कोपरगाव येथे शासकीय योजनांचा जागर करण्यात आला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असलेल्या ठिकाणी शासकीय योजनांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली.




जिल्हा माहिती कार्यालय, अहिल्यानगर आणि कोपरगाव येथील श्रद्धानगरी व जोशीनगर गणेशोत्सव मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात तहसीलदार महेश सावंत यांनी ज्येष्ठ नागरिक तसेच महिलांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. योजनांची पात्रता, उपलब्ध सुविधा आणि लाभ घेण्याची प्रक्रिया याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. पात्र नागरिकांनी आपल्या गरजेनुसार शासकीय योजनांची माहिती घेऊन पात्रतेनुसार योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत यांनी ‘लोकसंवाद–२०२६’ या उपक्रमाची भूमिका व उद्देश स्पष्ट केला. शासकीय योजनांची माहिती केवळ जाणून घेणे नव्हे, तर पात्रतेनुसार त्यांचा लाभ घेणे आणि या योजनांची माहिती कुटुंबातील तसेच परिसरातील इतर नागरिकांपर्यंत पोहोचविणे, हा ‘लोकसंवाद’ उपक्रमाचा महत्त्वाचा उद्देश आहे. शासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी अशा उपक्रमांतून जनजागृतीला चालना मिळते, असेही श्री. चिलवंत यांनी नमूद केले.

यावेळी स्वच्छतादूत व पर्यावरणप्रेमी सुशांत घोडके यांनी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांची सामाजिक जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले. परिसराची स्वच्छता राखणे, पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन देणे तसेच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेबाबत नागरिकांनी जागरूक राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास श्रद्धानगरी व जोशीनगर गणेशोत्सव मंडळाचे मकरंद जोशी, किरण वर्पे, महेंद्र निकम, अक्षय खजुरे, विजय भोकरे, संतोष कुलकर्णी, विकी नरोडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारनेर न्यायालयीन इमारतीस ४१.२९ कोटींची सुधारित मंजुरी

## आ. दातेंच्या पाठपुराव्याला यश..

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पारनेर येथे नवीन न्यायालयीन इमारत उभारण्याच्या कामाला आता गती मिळणार असून, महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाने ४१ कोटी २९ लाख ८१ हजार १०४ रुपयांच्या अंदाजित खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय २२ सप्टेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आला. ही माहिती आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली.





पारनेर येथील नवीन न्यायालयीन इमारतीसाठी यापूर्वी ३०.०७ कोटी रुपयांची मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. वाढीव सुविधा व सुधारित अंदाजपत्रकानुसार प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. त्यास आता मंजुरी मिळाल्याने प्रकल्पाचा सुधारित खर्च ४१.२९ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

# जुन्नर तालुक्यातील पंप स्टोरेज प्रकल्पाबाबत असणाऱ्या कायदेशीर बाबींचे कार्यकर्त्यांचे क्षमता बांधणी शिबिर संपन्न



जुन्नर (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील पंप स्टोरेज प्रकल्प मंजूर असलेल्या अंजनावळे, आडोशी,तळेचीवाडी व खुबी या दोन गावातील व सह्याद्री वाचवा संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांचे कायदेशीरबाबींचे क्षमता बांधणी शिबिर पुणे येथे पार पडले.या शिबिराला दोन्ही गावातील जवळपास २५ ते ३० कार्यकर्ते उपस्थित होते.शिबिरात मार्गदर्शन करण्यासाठी श्रमिक मुक्ती दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर,ज्येष्ठ पाणी विषयाचे अभ्यासक कार्यकर्ते के. जे. जॉय, डॉ. अमोल वाघमारे,किरण लोहकरे हे उपस्थित होते.

शिबिरात वनविभाग, जलसंपदा विभाग,ऊर्जा विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडून मिळाले ल्या मंजूर यांची आवश्यक प्रक्रिया,त्याबाबतीतले कायदे शीर मुद्दे यावर सखोल चर्चा झाली. कार्यकर्त्यांनी आपल्या मनातील या प्रकल्पाबाबतच्या शंका यावेळी उपस्थित केल्या व त्याबाबत त्यांना माहिती देण्यात आली.यावेळी झाले ल्या चर्चेमध्ये लक्ष्मण जोशी, सीमा रघतवान,सरपंच विजय काठे,भिमाबाई कोकणे, कोकणे सर,हर्षल कोकणे, अविनाश सुपे,सरपंच नितीन भोईर या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. प्रकल्पाचा सामंजस्य करार,पर्यावरणीय मूल्यमापन अहवाल, वन हक्कांची मंजुरी,पेसा ग्रामसभांचे अधिकार यावरही शिबिरात सखोल चर्चा झाली.

# कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीनिमित्त शिक्षणविचारांचा जागर

## टाकळी ढोकेश्वर गटाचे नेते रविंद्र राजदेव यांच्याकडून अभिवादन<br>प्र. ग. खिलारी पाटील विद्यालयाच्या विद्यार्थिनींच्या लेझीम सादरीकरणाने वेधले लक्ष

पारनेर (समर्थ गांवकरी)

रयतेच्या शिक्षणासाठी आयुष्यभर कार्य करणारे थोर समाजसुधारक व शिक्षणप्रसारक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्र. ग. खिलारी पाटील माध्यमिक विद्यालयाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते रविंद्र राजदेव यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. जयंतीनिमित्त कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेची ढोकेश्वरपरिसरातून पारंपरिक वाद्यांच्या तालावर उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व मान्यवर सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थिनींनी सादर केलेल्या अप्रतिम लेझीम नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थिनींचे शिस्तबद्ध व उत्स्फूर्त लेझीम सादरीकरण हे मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले.

यानंतर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे स्मरण करण्यात आले. ग्रामीण व वंचित समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे उपस्थितांनी सांगितले.



‘कमवा आणि शिका’ या विचारातून शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दिलेले योगदान समाजासाठी सदैव प्रेरणादायी राहील. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमास टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते रविंद्र राजदेव, प्र. ग. खिलारी पाटील माध्यमिक विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंडितराव झावरे, मळीभाऊ रांधवण, टाकळी ढोकेश्वरचे उपसरपंच रामभाऊ तराळ, रविंद्र बांडे, खामकर सर, शिक्षक कर्णा रोकडे, राऊत सर, भोंडवे सर, घोडके सर, भिंगारे सर, रोहकले मॅडम, थोरात मॅडम, ठागणे मॅडम, पवार मॅडम, शिक्षक, विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-ने येथे ग्रामीण युवक युवती साठी पाच दिवसीय कौशल्य विकास सेंद्रिय/नैसर्गिक शेती प्रशिक्षण संपन्न

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्रजी घुले पाटील, मा. आ. चंद्रशेखर घुले पाटील व सर्व संचालक मंडळ यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनातून आणि प्रोत्साहनातून कृषि विज्ञान केंद्र (केव्हीके), दहिगाव–ने यांच्या वतीने ग्रामीण युवकासाठी दिनांक १६ ते २० सप्टेंबर दरम्यान पाच दिवसीय सेंद्रिय व नैसर्गिक शेती कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षणाद्वारे परिसरातील शेतकऱ्यांना शाश्वत आणि कमी खर्चाच्या शेतीची एक नवी दिशा मिळाली आहे. या पाच दिवसांच्या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये उपस्थित शेतकऱ्यांना सेंद्रिय व नैसर्गिक शेतीची मूळ संकल्पना, तिची तत्त्वे आणि आधुनिक काळातील तिची गरज याविषयी तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. केवळ सैद्धांतिक माहिती न देता, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्यावर या प्रशिक्षणात भर देण्यात आला. जमीन सुपीकता आणि नैसर्गिक शेतीमधील अन्नद्रव्ये व्यवस्थापन याविषयी श्री बहिरट पी. एस. यांनी मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणादरम्यान श्री माणिक लाखे, विषय विशेषज्ञ पिक संरक्षण यांनी या प्रशिक्षणाच्या संयोजना दरम्यान स्थानिक संसाधनांतून निविष्ठा निर्मितीचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांचा शेतीवरील खर्च कमी व्हावा यासाठी स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या संसाधनांचा वापर करून नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या विविध निविष्ठा (Inputs) तयार करण्याचे थेट प्रात्यक्षिक घेण्यात आले. यामुळे कमी खर्चात शेतीचे व्यवस्थापन कसे करावे, याचे तंत्र शेतकऱ्यांनी आत्मसात केले. तसेच उत्पादनाचे मूल्यवर्धन आणि विक्री व्यवस्थापनाचे धडे दिले.प्रशिक्षणादरम्यान केवळ उत्पादनावरच नव्हे, तर उत्पादित मालाच्या व्यावसायिक व्यवस्थापनावरही विशेष मार्गदर्शन करण्यात आले.

नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्याकृषि मालाची गुणवत्ता टिकवणे, त्याचे मूल्यवर्धन (तरश्रींश ववळींळेप), पॅकिंग, ब्रँडिंग आणि योग्य विक्री व्यवस्था कशी उभी करावी, याचे धडे तज्ज्ञांनी दिले. शेतकऱ्यांच्या मालाला थेट व योग्य बाजारपेठ मिळावी यासाठी बाजारपेठेचा अभ्यास करणे, ग्राहकांशी थेट संपर्क साधणे आणि विक्रीच्या विविध संधी शोधणे याविषयीही सविस्तर माहिती देण्यात आली. डॉ. कौशिक एस.एस. वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुक कृषि विज्ञान केंद्र दहीगाव ने सेंद्रिय उत्पादन प्रमाणीकरणावर भर दिला.सध्याच्या







बाजारात सेंद्रिय उत्पादनांना असणारी मागणी लक्षात घेता, सेंद्रिय उत्पादन प्रमाणीकरण (जीसरपळल उर्शीीळषळलरींळेप) प्रक्रिया म्हणजे काय, त्यासाठी कोणत्या बाबी आवश्यक आहेत आणि त्याचे महत्त्व काय, याबाबत शेतकऱ्यांना जागरूक करण्यात आले. सदर प्रशिक्षण दरम्यान सौ. कल्याणी मुर्दारे, भगुर यांच्या नैसर्गिक शेती प्रक्षेत्राला भेट देवून संपूर्ण पिकांचे व जनावरांचे नैसर्गिक पद्धतीने व्यवस्थापन या विषयी महिती घेतली, तसेच दहिगाव येथील सौ. वनिता काळे यांच्या क्षेत्राला भेट देवून तेथील जीवामृत तयार करण्याची पदधत व देसी गाईचे संगोपन या विषयी माहिती घेतली.

सदर प्रशिक्षण यशस्वी करण्यसाठी कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ श्री. बडधे एस.डी. इंजी. राहुल पाटील, श्री दहातोंडे नंदकिशोर, श्री निबे नारायण डॉ. चंद्रशेखर गावळी आणि सर्व सहायक कर्मचारी यांनी अतिशय परिश्रम घेतले.

या यशस्वी प्रशिक्षणामुळे शेतकऱ्यांना निविष्ठा निर्मितीपासून ते थेट उत्पादन, प्रमाणीकरण आणि बाजारपेठ व्यवस्थापनापर्यंतची संपूर्ण कौशल्ये एकाच ठिकाणी शिकण्याची संधी मिळाली. कमी खर्च, स्थानिक संसाधनांचा योग्य वापर आणि शाश्वत शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न व शेतीची गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीनेकृषि विज्ञान केंद्र, दहिगाव–ने यांचा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला आहे. कार्यक्रमाच्या सांगता समारोहाच्या वेळी जिवंत सातबारा चे जनक व अमरावतीचे उपजिल्हाधिकारी श्री. संतोष काकडे यांनी केंद्राच्या ग्रामीण युवक युवतीसाठी राबवल्या जाणाऱ्या अश्या प्रकारच्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी विद्याधामच्या तीन खेळाडूंची दमदार निवड



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेच्या तीन कुस्तीपटूंनी तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे.

परिक्रमा शैक्षणिक संकुल, काष्टी येथे नुकत्याच पार पडलेल्या श्रीगोंदा तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत विद्याधामच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. १४ वर्षे वयोगटातील ३३ किलो वजनगटात राजलक्ष्मी महेश चव्हाण हिने अंतिम फेरीत अत्यंत चुरशीच्या लढतीत प्रतिस्पर्ध्याच्या डावावर अचूक प्रतिडाव टाकत चितपट विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला.

१७ वर्षे वयोगटातील ग्रीको-रोमन प्रकारात साई राजू खोले याने ११० किलो वजनगटात प्रथम क्रमांक मिळवला. तसेच १९ वर्षे वयोगटात रोहन भास्कर मोटे याने १३० किलो वजनगटात अव्वल स्थान मिळवत आपली ताकद सिद्ध केली.

या तिन्ही खेळाडूंची १ ते ३ ऑक्टोबरदरम्यान नेवासा फाटा येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली असून, त्यांच्या यशामुळे देवदैठण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### न्यायालयाचा हिरवा कंदील

#### आदिनाथ साखर कारखाना आता ओंकार ग्रुपच्या ताब्यात

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

करमाळा तालुक्यातील आदिनाथनगर, शेळगाव-भाळवणी येथील श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना ओंकार शुगर ग्रुपच्या ताब्यात येण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC) मार्फत राबविण्यात आलेल्या विक्री निविदा प्रक्रियेला न्यायालयाने मान्यता दिल्याने कारखान्याच्या हस्तांतरणावर शिक्कामोर्तब झाले असल्याची माहिती ओंकार शुगर ग्रुपचे संचालक ओमराजे बोत्रेपाटील यांनी दिली. अनेक वर्षांपासून आर्थिक अडचणींमुळे बंद अवस्थेत असलेल्या या कारखान्याच्या विक्रीसाठी राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळामार्फत पारदर्शक निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. संबंधित प्राधिकरणांच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून ही खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याचा दावा ओंकार ग्रुपने केला आहे.

ओंकार ग्रुपचे अध्यक्ष बाबुराव बोत्रेपाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याचे आधुनिकीकरण, उत्पादन क्षमता वाढविणे आणि कार्यक्षम व्यवस्थापनावर भर दिला जाणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच गाळप हंगाम सुरू करण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री, तांत्रिक सुधारणा आणि पायाभूत सुविधांवरही प्राधान्याने काम केले जाणार आहे. कारखाना पुन्हा सुरू झाल्यास करमाळा तालुक्यासह परिसरातील ऊस उत्पादकांना स्थानिक पातळीवर गाळपाची सुविधा उपलब्ध होणार आहे. याशिवाय ऊसतोड मजूर, वाहतूकदार, व्यापारी आणि लघुउद्योजकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आदिनाथ कारखान्याच्या पुनरुज्जीवनाबाबत शेतकरी आणि कामगारांमध्ये आशावादाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### मुंबई मनपा शाळांतील १.२७ लाख विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातून साकारला 'विकसित भारत'

मुंबई (समर्थ गांवकरी)

विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन आणि त्यांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ देणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'सेवा संकल्प अभियाना'ला विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे. या अभियानांतर्गत आयोजित भव्य चित्रकला स्पर्धेत मुंबईतील १,०४३ मनपा शाळांमधील तब्बल १ लाख २७ हजार ५६९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत आपल्या कल्पकतेतून 'विकसित भारत' आणि सेवाकार्यांचे रंगीबेरंगी चित्रविश्व साकारले. मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या मार्गदर्शनात महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून मंगळवारी (दि. २२) चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग म्हणजे त्यांच्या कलात्मक अभिव्यक्तीला मिळालेली मोठी संधी ठरली आहे.

कल्पकतेला मिळाली 'विकसित भारत'ची जोड

'विकसित भारत' आणि 'पंतप्रधान महोदयांनी केलेली सेवाकार्ये' या प्रेरणादायी विषयांवर विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीचे रंग भरले. इयत्ता पाचवी-सहावी, सातवी-आठवी आणि नववी-दहावी अशा तीन गटांत ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

# पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेची ३५ वी वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न

## ठेवीदार,सभासद,खातेदार यांचा विश्वास व संचालक मंडळाचा पारदर्शी कारभार यामुळे पतसंस्थेचा प्रगतीचा आलेख उंचावला आहे : वसंत लोढा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांनी प्रेरित होऊन सुरू झालेल्या पंडित दीनदयाळ नागरी पतसंस्थेने ३५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. संस्थेचा आर्थिक वर्षातील अहवाल सादर करताना मनस्वी आनंद होत आहे.

स्पर्धेच्या युगात अनेक खाजगी व सरकारी बँका, पतसंस्था असताना देखील संस्थेने आर्थिक प्रगतीचा आलेख उंचावत ठेवला आहे. संस्थेचे सभासद व वसूल भाग भांडवल हे संस्थेचे शक्तिस्थान झाले आहे.

संस्थेचे अधिकृत भाग भांडवल दोन कोटीचे असून ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेचे वसूल भाग भांडवल एक कोटी चार लाख तीन हजार नऊशे रुपये झाले आहे. भाग भांडवलामध्ये झालेली वाढ ही संस्थेवरील विश्वासाची प्रचिती देते.

संस्था सामाजिक व शैक्षणिक कार्यात अग्रेसर असून पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचे माध्यमातून समाज प्रबोधन व आरोग्य शिबिरे व अनुलोम संस्थेच्या माध्यमातून सामाजिक शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

संस्थेच्या स्वमालकीच्या दोन वास्तू आहेत.सावेडी येथे लवकरच नूतन पाच मजली आकर्षक व सावेडी परिसराच्या वैभवात भर घालणाऱ्या वास्तूचे भूमिपूजन होणार आहे.

ठेवीदार,सभासद,खातेदार यांचा विश्वास, संचालकांचा पारदर्शी कारभार यामुळे पतसंस्थेचा प्रगतीचा आलेख उंचावला आहे,असे प्रतिपादन पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन वसंत लोढा यांनी केले.

ऋग्वेद भवन येथे पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थापक चेअरमन वसंत लोढा यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी व्हाईस चेअरमन सुधीर पगारिया,मानद सचिव विकास पाथरकर,ज्येष्ठ संचालक मिलिंद गंधे,निलेश लोढा, शैला चंगेडे,अनंत होशिंग,आदित्य चांदेकर, बाबासाहेब साठे, सुभाष फणसे आदींसह गौतम दिक्षित, आर.डी.मंत्री,सुहास मूळे,धनंजय तागडे,सचिन पारखी,सुरज अग्रवाल, अशोक कानडे,ज्ञानेश्वर भांगे,नाथा देवतरसे,अशोक जगताप,सौ.सविता तागडे, अजिता एडके,उज्वला भांगे, व्यवस्थापक निलेश लाटे,सह व्यवस्थापक सुखदेव दरेकर, वसुली अधिकारी उमेश मेरगू आदी उपस्थित होते.

वसंत लोढा यांनी सांगितले की,संस्थेचा मजबूतीचा भाग म्हणजे संस्थेचा राखीव निधी दोन कोटी २४ लाख ६५ हजार ५५९.७ इतका होता. अहवाल सालामध्ये त्यामध्ये दहा लाख २१ हजार ६७७ रुपयांनी वाढ होऊन राखीव निधीमध्ये वाढ झाली आहे. संस्थेचा एकूण निधी पाच कोटी ७८ लाख ९४ हजार ३७३ एवढा झाला असून राखीव निधीमध्ये भरीव वाढ होणे ही आर्थिक संपन्नतेची व संस्थेच्या भरभक्कम पायाची पावती आहे.

सहकार क्षेत्रात गढूळ वातावरण व बाजारात मंदी असताना देखील संस्थेकडे एकूण ठेवी ८५ कोटी रुपयांच्या झालेल्या आहेत.अहवाल सालात ठेवींमध्ये ६ कोटी ३९ लाख रुपयांनी वाढ झालेली आहे.तसेच सुवर्णतारण कर्जामध्ये देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मागील वर्षी सोनेतारण कर्ज चार कोटी एवढे होते तर अहवाल सालात सोनेतारण कर्ज २२ कोटी एवढे झाले आहे.सोनेतारण कर्जाची पुनर्तपासणी करण्यात येते.तसेच संस्थेने २७ कोटी ४९ लाख रुपयांची सुरक्षित गुंतवणूक केलेली आहे.




संस्थेने कर्ज वसुलीसाठी एक स्वतंत्र विभाग केला असून एकूण कर्ज वसुली ही ७ कोटी ३१ लाख ३५ हजार एवढी झालेली आहे. त्यामुळे संस्थेचा एनपीए दिवसेंदिवस कमी होत आहे.

संचालक मंडळाच्या अहवाल सालात एकूण १३ सभा झालेल्या असून त्या सभांना सर्व संचालक उपस्थित होते.

# ओतूर पोलीस स्टेशन हद्दीतील १९५ सार्वजनिक गणेश मंडळांना 'सार्वजनिक गणेशोत्सव २०२६' मार्गदर्शक व जनजागृती माहितीपत्रकांचे वाटप

ओतूर (समर्थ गांवकरी)

ओतूर : आगामी सार्वजनिक गणेशोत्सव २०२६ शांततापूर्ण, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा तसेच गणेश मंडळे, कार्यकर्ते व नागरिकांमध्ये कायदा-सुव्यवस्था, सुरक्षितता आणि सामाजिक जबाबदारीबाबत जनजागृती व्हावी, यासाठी माननीय संदीप सिंग गिल (पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण) यांच्या संकल्पनेतून पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या 'सार्वजनिक गणेशोत्सव २०२६ मार्गदर्शक व जनजागृती माहितीपत्रकांचे' ओतूर पोलीस स्टेशन हद्दीतील सार्वजनिक गणेश मंडळांना वाटप करण्यात आले.

ओतूर पोलीस स्टेशन हद्दीत एकूण १९५ सार्वजनिक गणेश मंडळे असून, प्रत्येक मंडळास ९५ माहितीपत्रके याप्रमाणे एकूण १८,५२५ माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले आहे.





सदर माहितीपत्रकांमध्ये गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, महिलांची व बालकांची सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था, ध्वनी प्रदूषणास प्रतिबंध, अग्निसुरक्षा, आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी, अमली पदार्थांपासून दूर राहण्याबाबत जनजागृती, सायबर सुरक्षा, सामाजिक सलोखा तसेच गणेशोत्सव सुरक्षित व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याबाबत आवश्यक मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच गणेश मंडळांनी प्रशासन व पोलीस विभागाने दिलेल्या सूचनांचे पालन करून उत्सव काळात सार्वजनिक शांतता, सामाजिक सलोखा व कायदा-सुव्यवस्था राखण्यासए सहकार्य करावे, असे आवाहन ओतूर पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

गणेशोत्सव हा आनंद, भक्ती आणि सामाजिक एकोपा वाढविणारा उत्सव असून, 'उत्सव आनंदाचा, सुरक्षिततेचा आणि सामाजिक जबाबदारीचा' या भावनेतून सर्व गणेश मंडळांनी व नागरिकांनी गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कर्जुले हर्या येथे पिकअपची दुचाकीला धडक; तरुणाचा मृत्यू

## अहिल्यानगर-कल्याण महामार्गावरील अपघात; पिकअप चालकाविरुद्ध पारनेर पोलिसांत गुन्हा दाखल

पारनेर (समर्थ गांवकरी)

कर्जुले हर्या (ता. पारनेर) गावाच्या शिवारात बाबा का ढाबा हॉटेलसमोर अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर पिकअप व दुचाकीच्या झालेल्या अपघातात साहिल कैलास झावरे वय २१ दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. याप्रकरणी पारनेर पोलिसांनी पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवार (दि. २१ सप्टेंबर) रोजी दुपारी सुमारे १.२० वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. टाकळी ढोकेश्वर येथील फिर्यादी बाळासाहेब छबन झावरे (वय ५७) यांच्या तक्रारीनुसार, त्यांचा पुतण्या एमएच-१४ जेके-७४९९ क्रमांकाची दुचाकी चालवत संबंधित रस्त्याने जात होता. त्यावेळी समोरून अहिल्यानगरच्या दिशेने जाणाऱ्या एमएच-१६ डीपी-१८१२ क्रमांकाच्या महिंद्रा मॅक्स पिकअपचा चालक दिनेश पंढरीनाथ खोडदे (रा. भनगडवाडी, ता. पारनेर) याने वाहन भरधाव वेगाने चालवून विरुद्ध बाजूस येत दुचाकीला धडक दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# श्रीरामपूर विभागीय पोलीस उपअधीक्षक श्री. जयदत्त भवार साहेब यांची राहुरी तुळजाभवानी पालखी मंदिरास भेट

राहुरी (समर्थ गांवकरी)

कर्तव्यदक्ष पोलीस उपअधीक्षक श्री.जयदत्तजी भवर यांनीं उभ्या महाराष्ट्राची कुलस्वामिनी राहुरीची महिरवाशीन आई तुळजाभवानी पालखी मंदिर पालखीचे दर्शन घेऊन विधिवत पूजा करून पालखीची महात्मे समजून घेतले यावेळी राहुरी नगरपालिकेचे नगरसेवक तथा डॉ.बाबुराव बापूजी सहकारी शिक्षण संस्थेचे सचिव युवा नेतृत्व मा. श्री.हर्षदादा अरुणजी तनपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक.मा.श्री. महेशजी गोंडला साहेब पत्रकार सुनील भुजाडी आणि राहुरीचे नगरपरिषदेचे मा.नगराध्यक्ष मा.श्री. आसारामभाऊ शेजूळ यांची प्रमुख उपस्थिती होते



यांप्रसंगी तेली समाज्याच्या वतीने मान्यवरांचा सन्मान युवानेते हर्षदादा तनपुरे आणि मा. नगराध्यक्ष आसारामभाऊ शेजुळ यांच्या हस्ते करण्यात आला याप्रसंगी तेली समाज तालुकाध्यक्ष मा. श्री.दत्तात्रय सोनवणे उद्योजक मा. श्री.बाळासाहेब शेजुळ ज्येष्ठ तेली समाजसेवक मा. श्री.सुरेशदादा धोत्रे मा. श्री.कैलासदादा शेजुळ, नागपाल सारिजचे मा. श्री.राजेशजी नागपाल मा.दर्शन पटेल,सोहम सोनवणे,पोलीस कर्मचारी मा.नितीनकुमार शिरसाठ मा. नदीम शेख, अंकुश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते याप्रसंगी मान्यवरांचे आभार संदीप सोनवणे यांनी मानले.

# नंदनवन मित्र मंडळाचा 'युगत मांडली' जिवंत देखाव्याचे उत्साहात उद्घाटन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

टिळकरोडवरील नंदनवन मित्र मंडळाचे संस्थापक सदस्य दत्ता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या 'युगत मांडली' या जिवंत देखाव्याचे उद्घाटन नरसिंग पटेल आणि नगरसेविका सुवर्णा जाधव यांच्या हस्ते झाले. संस्थापक सदस्य दत्ता जाधव, संजय तात्या जाधव, अध्यक्ष विशाल जाधव, उपाध्यक्ष कुणाल गवळी आणि खजिनदार विशाल लोलगे आदी मान्यवर उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित या देखाव्यात विविध ऐतिहासिक प्रसंगांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले असून, नागरिक आणि गणेशभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

नगरसेविका सुवर्णा जाधव म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित 'युगत मांडली' हा जिवंत देखावा अत्यंत प्रेरणादायी आणि प्रभावी आहे. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी इतिहासातील



प्रसंग जिवंतपणे सादर करून नव्या पिढीसमोर महाराजांचे शौर्य, पराक्रम, स्वराज्याची संकल्पना आणि जनकल्याणाची भूमिका उभी केली आहे. अशा उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये इतिहासाविषयी अभिमान निर्माण होतो, तसेच मुलांना आपल्या संस्कृतीची आणि परंपरेची ओळख होते. नंदनवन मित्र मंडळ सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक उपक्रमांद्वारे सातत्याने उल्लेखनीय कार्य करत आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन कलाकारांचा आणि कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवावा.

दत्ता जाधव म्हणाले, नंदनवन मित्र मंडळ वर्षभर सामाजिक कार्यात अग्रेसर असते. दरवर्षी मंडळातर्फे नाविन्यपूर्ण सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक देखावे सादर केले जातात. यंदा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित 'युगत मांडली' हा जिवंत देखावा नगरकरांसाठी खुला करण्यात आला आहे. परिसरातील ज्येष्ठांच्या हस्ते या देखाव्याचे उद्घाटन करण्यात आले.

या उपक्रमासाठी संजय तात्या जाधव, अध्यक्ष विशाल जाधव, उपाध्यक्ष कुणाल गवळी आणि खजिनदार विशाल लोलगे यांचे सहकार्य लाभले.

# आर्थिक शिस्त व पारदर्शी कारभारामुळे १६५ कोटीचा ठेवीचा टप्पा पार : श्यामकाका निमसे

## मियाँसाहेब पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत पार पडली सभासदांना ११ टक्के लाभांश देणार

राहुरी (समर्थ गांवकरी)

मियासाहेब पतसंस्थेने आदरणीय स्वर्गीय शंकरराव निमसे (तात्यांच्या) मार्गदर्शनाखाली तेहतीस वर्षाच्या कालावधीत पारदर्शी कारभार करून अत्याधुनिक सुविधा व आर्थिक शिस्तीच्या जोरावर १६५ कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. यामुळे सभासदांचा विश्वास संपादन करून संस्थेची यशस्वी वाटचाल सुरु असल्याचे प्रतिपादन मियासाहेब पतसंस्थेचे चेअरमन शामराव निमसे यांनी केले. टाकळीमिया (ता. राहुरी ) येथील महादेव मंदिर प्रांगणात मियासाहेब ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत पार पडली. त्याप्रसंगी ते भाषणात बोलत होते. श्री. निमसे पुढे म्हणाले की, संस्थेच्या वतीने अल्प दरात टँकर सुविधा देऊन तात्यांच्या जयंतीनिमित्त नेत्र तपासणी शिबिराद्वारे बाराशे रुग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया केल्या आहेत. भविष्यातही तात्यांचा आदर्श घेऊन संस्थेची प्रगती कडे वाटचाल सुरू ठेवणार असल्याचे सांगितले. सभेच्या सुरुवातीला देशातील दिवंगत सैनिक, संस्थेचे दिवंगत सभासद, थोर नेते व साहित्यिकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

त्यानंतर सन २०२५-२०२६ या वर्षाचे आर्थिक पत्रक (तेरीज, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक) तसेच सरकारी ऑडीट मेमोचे वाचन जनरल मॅनेजर अनिरुद्ध लोखंडे यांनी केले त्यास सभेने एकमुखाने मंजुरी दिली. त्यानंतर सन २०२६-२०२७ या आगामी आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास सर्व सभासदांच्या मान्यतेने मंजुरी देण्यात आली. नंतर संस्थेच्या थकबाकीबाबत सविस्तर विचार- विनिमय करण्यात येऊन थकबाकी वसुलीस गती देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच संस्था संचालकांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या कर्जाचा तपशील सभेसमोर पारदर्शकपणे जाहीर करण्यात आला. सन २०२६ ते २०२७ या वर्षाकरिता वैधानिक लेखा परीक्षकाची (ऑडिटर) नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर सभे पुढे आलेले सर्व विषय एक मुखाने मंजूर करण्यात आले.

संस्थेचे उपाध्यक्ष अशोक शिंदे यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर मॅनेजर अनिरुद्ध लोखंडे यांनी वार्षिक कामकाजाची व विषयपत्रिकेची सविस्तर माहिती दिली. यावेळी सभासदांना ११ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. यावेळी परिसरातील विद्यालयातील




गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी साई आदर्श मल्टीस्टेट चे चेअरमन शिवाजीराव कपाळे यांनी सांगितले की,पारदर्शक कारभार आणि उत्कृष्ट सेवेच्या बळावर मियासाहेब पतसंस्था आज तालुक्यात प्रथम क्रमांकाची पतसंस्था बनली आहे. ग्राहकांचा दृढ विश्वास आणि उत्तम कामाची पावती म्हणजेच संस्थेत दिवसेंदिवस वाढणाऱ्या ठेवी आहेत. विश्वासार्हता, पारदर्शकता आणि अविरत प्रगती म्हणजेच मियासाहेब पतसंस्था असल्याचे सांगितले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९